*Dr. Kirit Somaiya*
*B.Com, FCA, Ph.D.*
*Ex-Member of Parliament*
*Member, BJP National Executive*
*Vice President, BJP Maharashtra*

**Bharatiya Janata Party**
**भारतीय जनता पार्टी**

नोव्हेंबर १२, २००७

## सरकारने कबूल केले कि, सडका गहू संपूर्ण ग्रामीण रोजगार योजना, बीपीएल, अदिवासी सामाजिक कल्याण योजनेखाली वितरित करण्यात आला.

**सत्य बाहेर येत आहे.** जिल्हा नागरी पुरवठा अधिकारी आता हळूहळू लाल आयात गव्हाबाबतची वस्तुस्थिती मान्य करीत आहेत. आता अधिकारी स्पष्टीकरणे देऊ लागले आहेत कि हा गहू

- संपूर्ण ग्रामीण रोजगार योजना
- बीपीएल, अदिवासी सामाजिक कल्याण योजना

या खाली वितरित केला जात आहे.

रत्नागिरी जिल्हाधिकारी कार्यालयाने भाजप नेता डॉ. किरीट सोमैय्या याना कळविले आहे कि, दापोली येथील सरकारी गोदामतून आपण प्राप्त केलेला निकृष्ट प्रतीचा गहू वरील योजनेखालील आहे.

जिल्हाधिकारी कार्यालयाने मान्य केले आहे कि बरेच दिवस गोदामात पडून राहिल्याने दर्जा कमी झाला असेल. अतिरिक्त जिल्हाधिकाऱ्यानी पुढे असेहि मान्य केले कि सार्वजनिक वितरण व्यवस्थेखाली काही चांगल्या प्रतीचा गहू वितरित करण्यासाठी पावले उचलण्यात येत आहेत.

ठाणे जिल्ह्याच्या नागरी पुरवठा अधिकाऱ्यानी कबूल केले आहे कि, लाल आयात गहू संपूर्ण ग्रामीण योजनेखालील आहे. तो सरकारी गोदामात पडून आहे. आता ऑक्टोबरमध्ये त्यानी पुढील वितरण थांबविले आहे.

भाजप नेता डॉ. किरीट सोमैय्या यानी राज्य सरकारला परत एकदा आवाहन केले आहे कि या भयानक लाल आयात गव्हाचे गरिबाना वितरण करणे थांबवावे. फेब्रुवारी २००७ पासून राज्य सरकारने असा १,१०,००० टन गहू भारतीय खाद्य निगमकडून खरेदी केला आहे. येथे एक गोष्ट लक्षात ध्यावी कि सरकारी प्रयोगशाळेत तपासणी केलेले २२९ नमुने या १,१०,००० गव्हापैकी होते.

वस्तुतः, भारत सरकारच्या अन् आणि नागरी पुरवठा मंत्रालयाने हा १,१०,००० टन निकृष्ट प्रतीचा गहू ताब्यात घेण्यासाठी महाराष्ट्र सरकारवर दबाव आणला होता. प्रत्यक्षात, भारत सरकार आणि महाराष्ट् सरकार यानी फेब्रुवारी-मार्चमध्ये खुल्या बाजारातील विक्रीसाठी निविदा मागविल्या होत्या. दोन्ही सरकारानी महाराष्ट्र रोलर फ्लोअर मिल्स असोशिएशन, महाराष्ट्र को-ऑपरेटटिव्ह मार्केटिंग फेडरेशन, मुंबई बेकर्स असोशिएशन, रेशनिंग कंट्रोलर्स ऑफ मुंबई आणि ठाणे आणि अन्य विभाग यांच्याकडे यासाठी पाठपुरावा केला होता. सरकार या भयानक दर्जाच्या गव्हाच्या खरेदीसाठी अन्य सहकारी सोसायट्यांकडेहि गेले होते. महाराष्ट्र सरकारने या गव्हापैकी ४४,२०५ टन गहू महाराष्ट्राच्या ३४ जिल्हाधिकारी कार्यालयानाही दिला होता. त्या सर्वानी सरकारी प्रस्ताव नाकारले.

डॉ. सोमय्या यानी कॉंग्रेस-राष्ट्रवादी सरकारवर परत एकदा आरोप केला कि, हा भयानक दूषित गहू महाराष्ट्रात मागच्या दाराने पुन्हा एकदा वितरणात आणण्यात आला. तो खालील योजनांसाठी वितरित करण्यात येत आहे.

१. संपूर्ण ग्रामीण रोजगार योजना
२. बीपीएल
३. अंत्योदया
४. अन्नपूर्णा
५. कामासाठी अन्न
६. अदिवासी

***प्रसिद्धी सचिव***

**BJP Office :** ● 11, Ashoka Road, New Delhi 110 001

➔**Please Reply :** 9C, Neelam Nagar, Mulund (E), Mumbai 400 081- Tel21639649/21634152
(M)9869220027 ● Fax : 21637432 - Email: kirit@vsnl.in, neelamnagar@rediffmaill.com
Website : www.kiritsomaiya.com